# महाराष्ट्र शासन

**स्मरणपत्र/अतितात्काळ**

ई-मेल : doesttclass२.wrd@maharashtra.gov.in
दूरध्वनी क्रमांक : (०२२) २२७९४१४५

क्रमांक : संकीर्ण -२०१८/प्र.क्र.२८८/१८/आ(वर्ग-२)
जलसंपदा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० ऑक्टोबर, २०२०.

**प्रति,**

जलसंपदा विभागातील सर्व महासंचालक,
सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग
जलसंपदा विभागातील सर्व मुख्य अभियंता
उप सचिव (सेवा/प्रशा/आस्था.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे
अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे/पुणे/औरंगाबाद/नागपूर/अमरावती
अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद, विशेष कक्ष, पुणे

**विषय** :- माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.

**संदर्भ** :- १. शासनाची समक्रमांकची पत्रे, दिनांक २३ डिसेंबर, २०१९, दिनांक ३० डिसेंबर, २०१९, दिनांक १६.१.२०२०, दिनांक २१.१.२०२० व दिनांक ३०.०९.२०२०
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०२०/प्र.क्र.१८७ अ/१६-ब, दि.३०.०६.२०२०
३. सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग यांचे अर्धशासकीय पत्र क्र.बासीसी २०१८/प्र.क्र.३०८ अ(भाग-३)/का.१६-ब, दिनांक २५.०९.२०२०

संदर्भ क्र.१ येथील दिनांक २३ डिसेंबर, २०१९, दिनांक ३० डिसेंबर, २०१९, दिनांक १६.१.२०२० व दिनांक २१.१.२०२० पत्रांन्वये अनुसूचीत जमाती प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या व सेवा संरक्षण घेत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २१ डिसेंबर, २०१९ मधील परिच्छेद ४.१ व ४.२ नुसार अधिसंख्य पदावर वर्ग करुन अहवाल तातडीने शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तथापि, अ.ज. प्रवर्गाचे जाती प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या वा जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग केल्याबाबतची कार्यवाही अद्यापही केल्याचे अद्यापही दिसून येत नाही. तसेच संबंधित क्षेत्रिय कार्यालयांकडून शासनास वेळोवेळी सादर केलेल्या अहवालांमध्ये तफावत आढळून येते. सबब, उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी पुनःश्च आढावा येऊन त्याबातचा एकत्रित अहवाल शासनास ( आ(वर्ग-२) कार्यासन तसेच संबंधित आस्थापना कार्यासनांना ) तात्काळ सादर करण्यात करण्याचे

शासनाच्या संदर्भ क्र.१ येथील दि.३०.९.२०२० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तथापि, शासनास सदर माहिती अद्याप प्राप्त झालेले नाही.

तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयानुसार सदर अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांनी सादर केलेल्या अहवालास अनुसूरुन त्या-त्या आस्थापना कार्यासनांनी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतची तात्काळ कार्यवाही करून सदर आदेशांच्या प्रतींसह अहवाल शासनास सादर करण्यात यावा. सदर कार्यवाही झाल्यानंतरच अधिसंख्य पदे निर्माण करण्याची कार्यवाही करणे शक्य होईल.

प्रस्तुत प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाकडून विभागाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. तसेच याबाबत न्यायालयीन प्रकरण वा प्रशासकीय बाबी उद्भवल्यास त्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी/विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांची राहिल, याची नोंद घेऊन सर्व प्राथम्याने कार्यवाही करण्याची विनंती आहे.

**( उ.र. दहिफळे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -**

कार्यासन आ(वर्ग-२) संग्रहार्थ.